अनेकान्त एज्युकेशन सोसायटी,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,बारामती

# NOTICE

Displayed on- 15/12/2021. 16 DEC 2021 Notice No. 272

## वरिष्ठ महाविद्यालय जात संवर्गातील (कॅटेगरी) विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप/फ्रिशिप फॉर्मभरणेबाबत अत्यंत महत्वाची सूचना

शै.वर्ष २०२१—२२ एस.सी., एस.टी, एन.टी., ओ.बी.सी., व एस.बी.सी या जातसंवर्गातील विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवर दि. १५/१२/२०२१ पासून स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरणेकरिता वेबसाईट सुरु झालेली आहे. तरी, विद्यार्थ्यांनी **www.mahadbtmahait.gov.in** या वेबसाईटवर शिष्यवृत्तीचे फॉर्म भरावेत.

ऑनलाईन फॉर्म भरणेकरीता खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

१. विद्यार्थ्याचा स्वत: च्या नावाचा जातीचा दाखला.

२. सन २०२०—२१ मधील मा. तहसिलदारांचा विद्यार्थ्याच्या वडीलांचे नावे उत्पन्नाचा दाखला एस.सीं, एस.टी या कॅटेगरीसाठी साठी स्कॉलरशिपकरीता उत्पन्नाची मर्यादा रु.२,००००० /— आहे व एन.टी, ओ.बी.सी, एस.बी.सी. या कॅटेगरीसाठी साठी स्कॉलरशिपकरीता उत्पन्नाची मर्यादा १,००००० /— आहे. एन.टी, ओ.बी.सी, एस.बी.सी. या कॅटेगरीसाठी साठी फ्रिशिपकरीता उत्पन्नाची मर्यादा रु.८,००००० /— पर्यंत आहे.

३. वडील हयात नसतील तर आईचा उत्पन्नाचा दाखला व सोबत वडिलांच्या मृत्युच्या दाखल्याची झेरॉक्स जोडावी.

४. आधारकार्ड झेरॉक्स.

५. आधारकार्ड बॅंकखाते व मोबाईल नंबरशी संलग्न असणे आवश्यक

६. मागील वर्षीचे मार्कशिट.

७. गॅप असेल तर गॅप ॲफिडेव्हीट आवश्यक.

८. डोमासाईल सर्टिफिकेट.

९. शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत व पी.जी. साठी टी.सी. जोडावा.

१०. स्वत: चे राष्ट्रीयकृत बॅकेत खाते असलेले बॅकपासबुक.
( आयएफएससी कोड व एमआयसीआर कोड नंबरचा पहिल्या पानावर शिक्का असणे आवश्यक आहे.)
११. रेशनकार्ड झेरॉक्स. (पहिले पान व कुटंबाचे नाव असलेले पान)
१२. शैक्षणिक वर्ष २०२१—२२ चे प्रवेश फी चलन झेरॉक्स.
१३. महाडीबीटीवरील ऑनलाईन प्रतिज्ञापत्र अपलोड करावे.
१४. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरतांना करंट डिटेल या कॉलममध्ये फी पेड या झिरो (शून्य ) टाकणे. अन्यथा रक्कम टाकल्यानंतर कॉलेजची फी सवलतीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बॅक खात्यावर जमा होईल व विद्यार्थ्यास पुन्हा महाविद्यालयाकडे रक्कम भरावी लागेल याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी.
१५. स्कॉलरशिप फॉर्म भरताना करंट डिटेल या कॉलममध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेश ग्रॅट मध्ये असेल तर **Aided** टाकावे व नॉनग्रॅटमध्ये प्रवेश असेल तर **UnAided** असे टाकावे. तसेच कॉलेजचे नाव बरोबर सिलेक्ट करावे.
१६. विद्यार्थ्यांना एकावेळी एकाच शिष्यवृत्ती योजनेचा फॉर्म भरावा. जर एखाद्या विद्यार्थ्याने कोणत्याही दोन योजनेचे फॉर्म भरल्यास एक योजना रिजेक्ट होते व यामध्ये कॅटेगरीतील विद्यार्थ्यांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होते. यासाठी विद्यार्थ्यांनी शक्यतो महाडीबीटी वरील पोस्ट मॅट्रीक स्कॉलरशीपचाच फॉर्म भरावा व एकाच योजनेसाठी अर्ज करावा.
१७. विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरताना खाली दिल्याप्रमाणे महाविद्यालयाचे नाव निवडावे/सिलेक्ट करावे.

**Senior College - Tuljaram Chaturchand College(0)**

महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन फॉर्म भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी फॉर्मची प्रिंट व वरील कागदपत्रे स्वत:जवळ ठेवावीत. विद्यार्थ्यांनी हार्ड कॉपी महाविद्यालयामध्ये जमा करण्याची गरज नाही. ज्या विद्यार्थ्यांचा प्रवेश फी सवलतीत झालेला आहे, अशा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन स्कॉलरशिप/फ्रिशिपचा फॉर्म भरला नाही, तर संबंधित विद्यार्थ्यांच्या होणा—या आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वत: जबाबदार राहतील व महाविद्यालयाची उर्वरित फी भरावी लागेल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

रजिस्टार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

अनेकान्त एज्युकेशन सोसायटी,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,बारामती

# NOTICE

Displayed on- 15/12/2021 16 DEC 2021 Notice No. 270

## इतर (ऑदर) शिष्यवृत्तीबाबत कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना महत्वाची सूचना

शै.वर्ष २०२१—२२ राज्यशासनाच्या विविध विभागाच्या गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनांचे पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन फॉर्म दि. १५/१२/२०२१ पासून ऑनलाईन भरणे सुरु झालेले आहे. तरी, विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे ऑनलाईन फॉर्म खाली दिलेल्या वेबसाईटवर भरावेत.

**Website - mahadbtmahait.gov.in**

**विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती**

१. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना.
२. एकलव्य आर्थिक सहाय्य. (पहिले वर्ष पदव्युत्तर)
३. गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना.

**(कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी यांनी सदरचा फॉर्म भरावा.)**

४. राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना. (पहिले वर्ष पदवी)
५. गणित व भौतिकशास्त्र विषयांतील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती. (पहिले वर्ष पदवी)
६. राज्यशासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (भाग—२)
७. माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य.
८. स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य.

महाडीबीटी वेबसाईट सदर योजनांचे नियम व अटी दिलेले आहेत. त्यावाचूनच विद्यार्थ्यांनी वरील योजनांचा ऑनलाईन फॉर्म भरावा.

**वरील सवलतीचा लाभ घेणा—या विद्यार्थ्यांनी एकावेळी एकच योजनेचा लाभ घेता येईल . तसेच कॅटेगरी व राजर्षी शाहू महराज शिक्षणशुल्क योजनेच्या विद्यार्थ्यांनी कॅटेगरीचा फी सवलतीचा फॉर्म भरणार असतील, तर वरील योजनेत फॉर्म भरु नये. अन्यथा दोन्ही योजनेचे फॉर्म रद्द होतील याची नोंद घ्यावी.**

**(विशेषत: विनाअनुदानित वर्गातील एस.सी/एस.टी. कॅटेगरीमधील विद्यार्थ्यांनी या योजनेचे फॉर्म भरु नयेत काही शंका असल्यास स्कॉलरशिप विभागात भेटावे)**

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

अनेकान्त एज्युकेशन सोसायटी,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,बारामती

# NOTICE

Displayed on- 15/12/2021 16 DEC 2021 Notice No. 271

## वरिष्ठ महाविद्यालय पदवी व पदव्युत्तर विभागासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना शिष्यवृत्ती (ई.बी.सी.) बाबत अत्यंत महत्वाची सूचना:—

शैक्षणिक वर्ष २०२१—२२ चे ऑनलाईन राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना शिष्यवृत्ती (ई.बी.सी) वरिष्ठ विभागाचे फॉर्म विद्यार्थ्यांना भरणेकरिता वेबसाईट दि. १५/१२/२०२१ पासून चालू झालेली आहे. वेबसाईट खालीलप्रमाणे आहे.

**Website - mahadbt mahait.gov.in**

फॉर्म सोबत खालीलप्रमाणे आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत

१. शै.वर्ष २०२०—२१ मा.तहसिलदारांचा उत्पन्नाचा दाखला. उत्पन्न मर्यादा रु. ८,०००००/— पर्यंत आहे. उत्पन्नाचा दाखला वडीलांच्या नावे असावा.
२. वडील हयात नसतील तर आईचा उत्पन्नाचा दाखला व सोबत वडिलांच्या मृत्युच्या दाखल्याची झेरॉक्स.
३. १० वी, १२ वी व त्यापुढील सर्व मार्कशिट आवश्यक आहेत.
४. शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत व पी.जी.साठी टी.सी.
५. आधारकार्ड झेरॉक्स.
६. आधारकार्ड बँकखाते व मोबाईल नंबरशी संलग्न असणे आवश्यक.
७. गॅप असेल तर गॅप ॲफिडेव्हीट आवश्यक.
८. डोमासाईल सर्टिफिकेट.
९. विद्यार्थ्यांचे स्वत:चे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असलेले बँकपासबुक. ( आयएफएससी कोड व एमआयसीआर कोड नंबरचा पहिल्या पानावर शिक्का असणे आवश्यक आहे.)
१०. रेशनकार्ड झेरॉक्स (पहिले व शेवटचे पान)
११. प्रवेश चलन झेरॉक्स.
१२. महाडीबीटीवरील ऑनलाईन प्रतिज्ञापत्र अपलोड करावे.

१३. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरतांना करंट डिटेल या कॉलममध्ये फी पेड या झिरो (शून्य ) टाकणे अन्यथा रक्कम टाकल्यानंतर कॉलेजची फी सवलतीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा होईल व विद्यार्थ्यास पुन्हा महाविद्यालयाकडे रक्कम भरावी लागेल याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी.

१४. स्कॉलरशिप फॉर्म भरताना करंट डिटेल या कॉलममध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेश ग्रँट मध्ये असेल तर **Aided** टाकावे व नॉनग्रँटमध्ये प्रवेश असेल तर **UnAided** असे टाकावे तसेच कॉलेजचे नाव बरोबर सिलेक्ट करावे.

१५. विद्यार्थ्यांना एकावेळी एकच शिष्यवृत्ती योजनेचा फॉर्म भरता येईल याची नोंद घ्यावी कोणत्याही दोन्ही योजनेसाठी अर्ज केल्यास एक योजना रिजेक्ट होते व यामुळे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. यासाठी एकच योजनेचा फॉर्म भरावा.

१६. विद्यार्थ्यांनी राजर्षी शाहू महाराज शिक्षणशुल्क योजनेचा फॉर्म ऑनलाईन भरताना खाली दिल्याप्रमाणे महाविद्यालयाचे नाव निवडावे.

**Senior College - Tuljaram Chaturchand College(0)**

महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन फॉर्म भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी फॉर्मची प्रिंट व वरील कागदपत्रे स्वत:जवळ ठेवावीत. हार्ड कॉपी महाविद्यालयात जमा करण्याची आवश्यकता नाही. ज्या विद्यार्थ्यांचा प्रवेश फी सवलतीत झालेला आहे, अशा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन राजर्षी शाहू महाराज शिक्षणशुल्क योजनेचा फॉर्म भरला नाही, तर संबंधित विद्यार्थ्यांच्या होणा—या आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील व विद्यार्थ्यास महाविद्यालयाची उर्वरित फी भरावी लागेल याची विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार | TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI | प्राचार्य

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

## Notice

Notice No. 183

Displayed on : 22/10/2021 22 OCT 2021

**उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी" या योजनेअंतर्गत २०२१–२२ करिता अर्ज मागविणेसाठी करावयाच्या कार्यवाही संदर्भात महत्वाची सूचना.**

"गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली आहे. सदरची योजना शासन निर्णयान्वये काही सुधारणांसह शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२१–२२ करीता सदर शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाचा असून सदर अर्ज भरण्यासाठीची अंतिम मुदत वाढवून, उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत दिनांक १ नोव्हेंबर, २०२१ अशी करण्यात येत आहे.

तरी, जे विद्यार्थी इच्छुक आहेत अशा विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, अर्ज तपासणी व स्वीकृती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे या कार्यालयात दि. १ नोव्हेंबर, २०२१ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) या कालावधीमध्ये उपस्थित रहावे.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\users\amsolankar\Scholarship 2021-22\Scholarship Notice 2021-22\NSP Revised.docx

Anekant Education Society's
# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Notice No. 104

Displayed on : 06/09/2021

6 SEP 2021

## National Means cum merit Scholarship

### कनिष्ठ महाविद्यालय शिष्यवृत्ती संदर्भात विद्यार्थ्यांना महत्वाची सूचना.

शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतलेला आहे व संबधित विद्यार्थी मागील दोन वर्षापूर्वी अनुक्रमे इयत्ता ९ वी व १० वी मध्ये एनएमएस ही शिष्यवृत्ती घेत होते अशा विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये **www.scholarships.gov.in** या पोर्टलवर दि. १५/११/२०२१ पर्यंत एनएमएस स्कॉलरशिचा फॉर्म आवश्यक त्या कागदपत्रासह रिनिवल करावा. जे विद्यार्थी सदरचा शिष्यवृत्तीचा फॉर्म रिनिवल करणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप मिळणार नाही व होणा–या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार

Tuljaram Chaturchand College Baramati

प्राचार्य

Anekant Education Society's
**Tuljaram Chaturchand College, Baramati**

# Notice

Notice No. 229

Displayed on : 25/11/2021

## कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना NSP पोर्टलवरुन राबविण्यात येणा–या केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक व दिव्यांगजन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती फॉर्म भरणेसाठी महत्वाची सूचना.

शैक्षणिक वर्ष **2021- 22** साठी **NSP** पोर्टलवरुन राबविण्यात उच्च शिक्षण संचलनालयामार्फत येणा–या केंद्रशासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनेमध्ये खालील तीन प्रकारच्या शिष्यवृत्ती योजना आहेत.

१. अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना.

२. महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना. (फक्त वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी)

३. दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना.

सदरच्या शिष्यवृत्ती योजनांची अंमलबजावणी दि. १८ ऑगस्ट २०२१ पासून सुरु झालेली आहे व याची फॉर्म भरणेची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर २०२१ अशी निर्धारित केलेली आहे.

तरी, सदर शिष्यवृत्ती योजनांसाठी एन.एस.पी. पोर्टलवर प्राप्त झालेल्या रिपोर्टनुसार अद्याप ब–याच विद्यार्थ्यांनी अल्पसंख्यांक व दिव्यांगजन केंद्रशासन पुरस्कृत विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे अत्यंत कमी फॉर्म भरलेले आहेत असे निदर्शनास आलेले आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांना याव्द्वारे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी वरील शिष्यवृत्ती योजनेसाठीचे अर्ज **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावर दि. ३०/११/२०२१ पर्यंत प्राधान्याने भरावेत.

यासंदर्भातील सर्व सविस्तर नोटीसा महाविद्यालयाच्या **www.tccollege.org** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच या नोटीस सोबत जोडत आहोत याची नोंद घ्यावी.

रजिस्टार

प्राचार्य

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

D:\users\amsolankar\Scholarship 2021-22\Scholarship Notice 2021-22\NSP Revised.docx

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Displayed on :20/09/2021 Notice No. 20 SEP 2021 NO-131

## केंद्र शासनाची कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती शैक्षणिक वर्ष २०२१–२२

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे मार्फत दिव्यांगजन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे या उद्देशाने पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२१–२२ साठी नविन व नूतनीकरणासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी, विद्यार्थ्यांनी दिलेल्या नियम व अटींच्या आधीन राहून विद्यार्थ्यांनी **www. scholarships.gov.in** या संकेतस्थळावर दि. ३०/११/२०२१ पर्यंत ऑनलाईन अर्ज करावेत.

नियम व अटी –

१. अर्जदार हा भारताचा रहिवासी असावा.

२. अर्जदाराची अपंगत्व टक्केवारी ४० टक्के व त्यापुढील असावी.

३. अर्जदार मागील वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.

४. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड लाभार्थी नसावा.

५. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.२.५० लाख इतकी असावी.

६. एका कुटूंबातील फक्त २ अपंग अपत्यांनांच सदर योजनेचा लाभ घेता येईल.

अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे

१. विद्यार्थ्यांचा फोटो.

२. मागील वर्षाची गुणपत्रिकेची प्रत.

३. पालकांचा सन २०२०–२१ चे मा. तहसिलदार यांनी प्रमाणित केलेला वार्षिक उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

विद्यालयाची चालू वर्षाची फी भरल्याची पावती /रिसीट.

स्वत:च्या राष्ट्रीयकृत बॅक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत.

६. विद्यार्थ्याचे अपंग असल्याबाबतचे प्रमाणपत्र राज्य शासनाच्या सक्षम वैद्यकिय अधिका—याने प्रमाणित केलेले असणे आवश्यक आहे.

७. आधारकार्ड छायांकित प्रत. तथापि एखाद्या विद्यार्थ्याकडे आधारकार्ड नसेल तर त्या विद्यार्थ्याने नोंदणी आयडी स्लीप किंवा बॅक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅनकार्ड अथवा ड्रायव्हिंग लायसन्सची प्रत इ. यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी.

८. आधार क्रमांक बॅक खात्याशी लिंक केलेला असणे आवश्यक आहे.

तरी, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या स्कॉलरशिप फॉर्मची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे दि. ०२/१२/२०२१ पर्यंत 'प्रशासन भवन' येथे जमा करावेत याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार

प्राचार्य

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Displayed on : 06/09/2021 6 SEP 2021 Notice No. 105

## अल्पसंख्यांक समाजातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना केंद्र शासनाची मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना सन २०२१–२२

नवीन (Fresh) व नूतनीकरण (Renewal)

## कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी

## Web site – www.scholarships.gov.in

केंद्र शासनाकडून **मुस्लिम, खिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन** अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना राज्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०२१–२२ साठी **ऑनलाईन** भरण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. यासाठी विद्यार्थ्यांचे नविन शिष्यवृत्ती व शिष्यवृत्तीचे नूतनीकरण करण्यासाठी www.scholarships.gov.in ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे आहेत. कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन अर्ज स्विकारण्याची विनंती मान्य केली जाणार नाही. शै. वर्ष २०२१–२२ साठी केंद्रशासनामार्फत **ऑनलाईन फॉर्म भरण्याची अंतिम मुदत दि. ३०/११/२०२१ आहे. व शैक्षणिक वर्ष २०२१–२२साठी ४७५७५ संच निर्धारित केले आहेत.**

* शिष्यवृत्तीसाठी पात्र अभ्यासक्रम :

११ वी ते पी.एच.डी, व्यावसायिक (डी.एड.,बी.एड्.,एम. एड्.,आय.टी.आय.) सर्व डिप्लोमा व अकरावी / बारावी स्तरांवरील एम.सी.व्ही.सी.अभ्यासक्रम. (तंत्र शिक्षण विभागातील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यादीतील अभ्यासक्रम सोडून इतर सर्व).

* किमान पात्रता व अटी :

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. मागील परीक्षेत किमान ५०% गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.
३. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.
४. नुतनीकरणासाठी विद्यार्थ्याने पुढील वर्गात प्रवेश घेतलेला असावा.
५. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न २.०० लाखा पर्यंत असावे.

६. एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटींचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल /वसूल केली जाईल.
७. विद्यार्थ्याने राष्ट्रीयकृत बॅकेत स्वत:चे खाते उघडणे आवश्यक आहे. सदर खाते आधारकार्डशी लिंक आणे आवश्यक आहे.
८. नूतनीकरणासाठी विद्यार्थ्यास मागील वार्षीक परीक्षेत ५० टक्के गुण असणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थी त्याच महाविद्यालयात व त्याच अभ्यासक्रमात शिकत असणे आवश्यक आहे.
९. विद्यार्थ्याने घेतलेलेल्या अभ्यासक्रमाचा एक वर्ष कालावधी असणे आवश्यक आहे.

* अर्ज करण्याची पध्दत (नविन मंजुरी/नूतनीकरण)

१) अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे, यासाठी National Scholarships(NSP) या मोबाईल ॲपची सुविधा देखील अर्ज भरण्यासाठी देण्यात आलेली आहे.

२) ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या होमपेज वरील Frequently Asked Questions (FAQ) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

४) ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण झाल्यास महाविद्यालयाशी संपर्क साधावा. सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये येण आवश्यक अनिवार्य आहे.

५) विद्यार्थ्याने ज्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे. त्या अभ्यासक्रमाच्या प्रथमवर्षी शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांनी नूतनीकरणाचा अर्ज भरावा.

* **विद्यार्थ्यांनी फॉर्मसोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.**

१. अर्जावर विद्यार्थ्याचे पासपोर्ट साईजचे छायाचित्र (फोटो) स्वाक्षरीसह असावा.
२. मागील वर्षाच्या गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत.
३. महाविद्यालयाने संबधित विद्यार्थी त्या महाविद्यालयात असल्याबाबतचे तसेच डे स्कॉलर/ होस्टेलर याबाबतची पडताळणी केल्याबाबतचे प्रपत्र (Institution Verification form FAQs ) सोबत देण्यात आलेला आहे.
४. विद्यार्थ्याचे अल्पसंख्याक असल्याबाबतचे स्वयंघोषित घोषणापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे व १८ वर्षाखालील विद्यार्थ्यांनी पालकांचे स्वयंघोषित घोषणापत्र/ प्रमाणपत्र जोडावे.
५. मा. तहसिलदार यांचा सन २०२०---२१ चा उत्पन्नाचा दाखला.
६. राष्ट्रीयकृत बॅक पासबुकाच्या पहिल्या पानाची ज्यावर खातेदाराचे नांव, पत्ता, खाते क्रमांक व आय.एफ.एस.सी. कोड नंबरची नोंद आहे, त्याची छायांकीत प्रत जोडावी. सदर बॅक खाते चालू स्थितीत असावे.

७. आधार कार्डाची छायांकित प्रत जोडावी.

८. प्रवेश फी भरलेल्या चलनाची झेरॉक्स.

९. बोनाफाईड सटिफिकेट.

१० रहिवासी प्रमाणपत्र (डोमासाईल)

११. आधारकार्ड छायांकित प्रत. तथापि एखाद्या विद्यार्थ्याकडे आधारकार्ड नसेल तर त्याऐवजी त्या विद्यार्थ्याचे आधार नोंदणी आय.डी. स्लीप किंवा पॅनकार्ड अथवा ड्रायव्हिंग लायसन्सची प्रत अथवा प्राचार्यांची सहा शिक्का असलेले फोटोसह बोनाफाईड सर्टीफिकेट जोडावे.

१२. वरील सर्व कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करावीत व विद्यार्थ्यांनी त्यांच्या ऑनलाईन भरलेल्या अर्जाच्या हार्ड कॉपी सोबत सर्व कागदपत्रे महाविद्यालयात तपासणीसाठी त्वरित सादर करावे

१३. जे विद्यार्थी एस.टी, एस.सी, एन.टी, ओ.बी.सी, एस.बी.सी, राजर्षी शाहू महाराज शिक्षणशुल्क योजना या कॅटेगरीतील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा प्रवेश फी सवलतीमध्ये घेतलेला आहे. व महाडीबीटीवर स्कॉलरशिचा फॉर्म भरणार असल्यास अशा विद्यार्थ्यांना अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीचा स्कॉलरशिपचा फॉर्म भरता येणार नाही विद्यार्थ्यांना एका वेळेस एकाच योजनेमधील शिष्यवृत्तीचा लाभ मिळेल. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**तरी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट व आवश्यक कागदपत्रांसहित दि. ०४/१२/२०२१ पर्यंत महाविद्यालयाच्या 'प्रशासन भवन' मध्ये जमा करावी याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE * BARAMATI

प्राचार्य

D:\users\amsolankar\Scholarship 2021-22\Scholarship Notice 2021-22\Minority Scholarship 2020-21.docx

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Displayed on : ~~05/09/2020~~ 2 SEP 2021 Notice No. 98

## भारत सरकारची (सेंट्रल सेक्टर) महाविद्यालयीन व विद्यापीठ शिक्षण घेणा–या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सन २०२१–२०२२

उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी/मार्च २०२१मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी पदवी वर्गातील प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांना नवीन अर्ज व पदवी वर्गातील व्दितीय व तृतीय वर्षासाठी व पदव्युत्तर वर्गातील प्रथम व व्दितीय वर्षातील विद्यार्थ्यांना नूतनीकरण करणेसाठी अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने मागविण्यात येत आहेत. आफॅलाईन अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**केंद्रशासनामार्फत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३० नोव्हेंबर २०२१ आहे.**

नवीन मंजूरीसाठी **(Fresh)**ज्या विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या **Top 20th Percentile Merit List** मध्ये समावेश आहे, त्याच विद्यार्थ्यांचे नवीन मंजूरी (Fresh) शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन (Online) भरले जातील. सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या **www.dhepune.gov.in** संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्या यादीत नाव असेल अशाच विद्यार्थ्यांनी फॉर्म भरावयाचा आहे व सदर विद्यार्थ्यांनी दुस–या कोणत्याही शिष्यवृत्तीचा फॉर्म भरलेला नसावा.

**किमान पात्रता व अटी :**

१. अर्जदार भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा/स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.
३. अर्जदाराच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा अधिक नसावे.
४. ही शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. मात्र कोणताही पदविका अभ्यासक्रम तसेच पत्राद्वारा व दूरस्थ शिक्षणासाठी (Diploma, Correspondence Courses & Distance Education) ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

५. कला, वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पाच वर्षापर्यंत शिष्यवृत्ती देय राहील.

६. या शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांना बॅक खात्यामध्ये केंद्र शासनाच्या कडून परस्पर जमा करण्यात येणार असल्यामुळे विद्यार्थ्यांनी जवळच्या कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेत खाते उघडून त्याचा खाते क्रमांक, आय.एफ.एस.सी., एमआयसीआर कोड अर्जामध्ये अचूकपणे नमूद करणे आवश्यक आहे. अन्यथा सादर केलेला अर्ज शिष्यवृत्तीस पात्र ठरणार नाही. तसेच नमूद बॅक खाते क्रमांक हा त्याच्या आधार कार्ड क्रमांकाशी संलग्न (Link) असणे अत्यावश्यक आहे.

७. खाते क्रमांक व इतर बॅक तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्याची राहील. विद्यार्थ्याचा बॅक खाते क्रमांक मेजर असावा व जाईंट खाते नसावे.

८. जे विद्यार्थी एस.टी, एस.सी, एन.टी, ओ.बी.सी, एस.बी.सी, राजर्षी शाहू महाराज शिक्षणशुल्क योजना या कॅटेगरीतील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा प्रवेश फी सवलतीमध्ये घेतलेला आहे. व महाडीबीटीवर स्कॉलरशिचा फॉर्म भरलेला असल्यास अशा विद्यार्थ्यांना सेंट्रल सेक्टर स्कॉलरशिपचा फॉर्म भरता येणार नाही विद्यार्थ्यांना एका वेळेस एकाच योजनेमधील शिष्यवृत्तीचा लाभ मिळेल. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे :–**

**नवीन मंजुरी /(Fresh)**

**१. इयत्ता १२ वी ची गुणपत्रिका.**
**२. पालकांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र २०२०–२१ चे तहसिलदार यांनी दिलेले असावे**
**३. डोमासाईल सर्टीफिकेट व जातीचा दाखला**
**४. आधारकार्ड/बॅक पासबुक झेरॉक्स**
**५. राष्ट्रीयकृत बॅकेचे पासबुक झेरॉक्स**
**६. प्रवेश चलन**
**७. अर्जावर विद्यार्थ्यांचा फोटो**

- <u>शिष्यवृत्तीचे नूतनीकरण (Renewal)</u> :

१. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणासाठी मागील वर्षाची गुणपत्रिका ऑनलाईन अपलोड करावी लागेल.
२. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज पुढील कार्यवाहीसाठी विचारात घेतले जाणार नाही.
३. नुतनीकरणाच्या अर्जासोबत मागील वर्षाच्या गुणपत्रिकेची छायांकित प्रत व राष्ट्रीयकृत बॅक खाते पासबुकाच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत सोबत जोडावी.
४. विद्यार्थ्याच्या अर्जासोबत आधार कार्ड असणे आवश्यक आहे. तसेच त्याचा आधारक्रमांक हा त्याच्या बॅक खात्याशी संलग्न असणे आवश्यक आहे.

• <u>नविन मंजूरी आणि नूतनीकरणासाठी अर्ज करण्याची कार्यपध्दती:—</u>

**१. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व नूतनीकरणासाठी** www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्द्तीने अर्ज करणे आवश्यक आहे.

२. नवीन मंजुरीसाठी ज्या विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक मंडळाच्या TOP 20 Th Percentile merit list समावेश असेल त्याच विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन भरले जातील. सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या www.dhpune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द् करण्यात आलेली आहे.

३. ज्या विद्यार्थ्यांकडे आधारक्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांचा आधारक्रमांक या पर्यायाचा वापर करुन भरावा. आधारकार्ड नसेल तर त्याऐवजी अशा विद्यार्थ्यांनी आधार नोंदणी आय.डी.स्लीप् किंवा बॅक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत अपलोड करुन अर्ज भरावा.

४. विद्यार्थ्यांना लाभ मिळणेसाठी आधार क्रमांक त्यांच्या बॅक खात्याशी संलग्न (लिंक)असणे आवश्यक आहे. व बॅक खाते विद्यार्थ्यांचे स्वत:चे असावे जॉईंट खाते नसावे.

५. ऑनलाईन अर्ज भरताना होम पेज वरील सर्व माहिती वाचून अर्ज भरावा व ऑनलाईन अर्ज भरुन झाल्यानंतर परिपूर्ण अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासहित महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करावा.

**रिनिवल मंजूरीच्या अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :**

१. अर्जावर विद्यार्थ्यांचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (फोटो).
२. मार्च /एप्रिल—२०२१ गुणपत्रिकेची प्रत
३. राष्ट्रीयकृत बॅक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत.
४. आधारकार्डाची छायांकित प्रत
५. प्रवेश चलनाची झेरॉक्स.
६. जातीच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत.

**तरी, विद्यार्थ्यांनी नवीन व नूतनीकरण ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट आवश्यक त्या कागदपत्रांसहित दि. ०५/१२/२०२१ पर्यंत 'प्रशासन भवन' येथे जमा करावेत याची विद्यार्थ्यांनी गांभीयनि नोंद घ्यावी.**

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

# Notice

Notice No. 359 Displayed on : 31.01.2022

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत शिष्यवृत्ती योजना.

(शै. वर्ष २०२१–२२ वरिष्ठ महाविद्यालयातील फक्त जात संवर्गातील विद्यार्थ्यांसाठी )

## "राजर्षी छत्रपति शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना"

मागासवर्गीय घटकातील गुणवत्ताधारक गरजू विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठामार्फत सदर शिष्यवृत्ती योजना कार्यान्वित केलेली आहे. सदर योजना फक्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी लागू असून पदवी व पदव्युत्तर अव्यवसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज (सर्व संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ विभागातील एकत्रित) गुणवत्तेनुसार विचारात घेतले जातील त्यापैकी ४८ टक्के मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा एकत्रित गुणवत्तेनुसार व उर्वरित ५२ टक्के विद्यार्थ्यांचा त्या त्या प्रवर्गासाठी लागू असलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीनुसार गुणानुक्रमे अर्ज विचारात घेतले जातील. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील योजनेस पात्र विद्यार्थ्यांना पुढील निकषानुसार शिष्यवृत्ती योजना लागू राहील. **सदर योजनेसाठी ऑनलाईन फॉर्म भरणेची मुदत ११/०२/२०२२ पर्यंत खालील वेबसाईटवर भरावेत.**

**http://bcud.unipune.ac.in/Scholorships/Applicant/Login.aspx**

- **नियम, अटी व पात्रता पुढीलप्रमाणे –**

१. सदरची योजना फक्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांनाच लागू होणार आहे.

२. सदरच्या योजनेसाठी उत्पन्नाची कोणतीही अट राहणार नाही. केवळ गुणवत्ता हा निकष राहील.

३. विद्यार्थ्याने मागील परीक्षेत एप्रिल/मे २०२१ किमान ६०% गुण मिळविलेले असावेत.

४. शिष्यवृत्ती योजनेचा फायदा विद्यार्थ्यांस संपूर्ण पदवी व पदव्युत्तर काळात एकदाच दिला जात असल्याने पदवी वर्ग व पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला असेल अशा विद्यार्थ्यांनी पुन्हा अर्ज भरु नयेत.

५. महाविद्यालय/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्याने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.

६. विद्यार्थ्याची नियमित अभ्यासक्रमात किमान ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक राहील

७. पात्र विद्यार्थ्यास पदवी अभ्यासक्रमासाठी कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना रु ६०००/— व विज्ञान शाखेसाठी १०,०००/— पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना रु ८०००/— व विज्ञान शाखेसाठी १६,०००/— असे आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

८. सर्व अव्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्याचा गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीसाठी विचार केला जाईल.

९. विद्यार्थ्यास गैरशिस्त/नैतिकता/परिक्षेतील गैरप्रकार इ.बाबत शिक्षा झालेली नसावी.

१०. विद्यार्थ्याने बॅक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे.

११. सदरचे अर्थसहाय्य पात्र विद्यार्थ्यास संपूर्ण अभ्यासक्रमात एकदाच देण्यात येईल.

१२. पात्र विद्यार्थ्याचे वय पदवी अभ्यासक्रमाकरिता २५ व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता ३० पेक्षा जास्त नसावे.

१३. शासनाकडून व विद्यापीठाकडून देण्यात येणा—या विविध शिष्यवृत्तीमध्ये विद्यार्थ्याचा आधारक्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. तसेच सदर आधारकार्ड क्रमांक आपल्या बॅक खात्याशी संलग्न असणेही आवश्यक असल्याने त्याची माहिती बॅकेस देण्यात यावी.

१४. सदर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ विहीत केलेल्या विद्यार्थी संख्येनुसार देण्यात येणार असून त्यापैकी ४८ टक्के विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार (मागास वर्ग विद्यार्थ्यांची एकत्रित गुणवत्ता विचारात घेऊन) व उर्वरित ५२ टक्के गुणवत्ताधारक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्या त्या प्रवर्गासाठी शासनाने विहित केलेल्या आरक्षणाच्या टक्केवारनुसार शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाईन.

१५. शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळत असलेल्या विद्यार्थ्यास सदर योजना लागू राहणार नाही. याबाबत संबधित विद्यार्थीनीने आणि प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरुन देणे आवश्यक राहील.

**अर्जासोबत ऑनलाईन अपलोड करावयाची कागदपत्रे**

१. विद्यार्थ्याच्या मागील वर्षाची एप्रिल/मे— २०२१ मार्कलिस्टची स्वंयसाक्षांकित झेरॉक्स प्रत.

२. आधारकार्डच्या झेरॉक्सची स्वंयसाक्षांकित प्रत.

३. जातीच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत.

४. शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत.

५. राष्ट्रीयकृत बॅकेच्या बचत खातेच्या पासबुकची झेरॉक्स

६. फॉर्मसोबत आधारकार्ड लिंकिग सिडींग स्लीप जोडणे आवश्यक आहे.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\users\amsolankar\Scholarship 2021-22\Scholarship Notice 2021-22\University Scholarship Notice 2021-22.docx

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

## Notice

Notice No. 371 Displayed on : 14/02/2022

---

**कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील जात संवर्गातील ओ.बी.सी, एन.टी, एस.बी.सी, विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनांसाठी शासनाने उत्पन्न मर्यादा वाढविलेबाबत महत्वाची सूचना.**

शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयात जे विद्यार्थी ओ.बी.सी, एन.टी, एस.बी.सी या कॅटेगरीमध्ये प्रवेशित आहेत. अशा सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी (केंद्र पुरस्कृत योजना) महाराष्ट्र शासनाने विद्यार्थ्यांच्या पालकांची उत्पन्न मर्यादा रु. १.०० लाख (अक्षरी रक्कम रु. एक लाख) वरुन रु. १.५० (अक्षरी रक्कम रुपये दीड लाख फक्त) इतकी करण्यास मान्यता दिलेली आहे.

तरी, अद्याप पर्यंत वरील कॅटेगरीतील ज्या विद्यार्थ्यांनी उत्पन्न मर्यादेमुळे शिष्यवृत्ती फॉर्म भरलेला नव्हता अशा सर्व ओ.बी.सी, एन.टी, एस.बी.सी. या कॅटेगरीच्या विद्यार्थ्यांनी वाढीव उत्पन्नाचा लाभ घ्यावा. व महाडीबीटीवर आपले शिष्यवृत्ती अर्ज दि. २८/०२/२०२२ पर्यंत भरावेत. या दिलेल्या मुदतीत विद्यार्थ्यांनी जर शिष्यवृत्तीचे फॉर्म भरले नाहीत. तर, होणा–या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही. याची संबधित सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\users\amsolankar\Scholarship 18-19\Notice\Scholarship Notice New 2018-19 New.docx

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

# NOTICE

नोटीस नं. ३६० दि. 3 FEB 2022

## शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिष्यवृत्ती फॉर्म मधील त्रुटी पूर्तता करुन शिष्यवृत्ती अर्ज Re-Apply करणेसाठी विद्यार्थ्यांना अत्यंत महत्वाची सूचना

शैक्षणिक वर्ष **२०२०-२१** मधील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिष्यवृत्तीचे फॉर्म ज्या विद्यार्थ्यांनी भरलेले होते व यामधील काही विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती फॉर्म मध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज त्रुटी दुरुस्त करणेसाठी विद्यार्थ्यांच्या लॉगिनवर पाठविलेले होते. अशा सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, दि. २८/०२/२०२२ पर्यंत त्रुटींची पूर्तता करुन सदरचे फॉर्म कॉलेज लॉगिनवर **Re-Apply** करावेत. जे विद्यार्थी याची कार्यवाही करणार नाहीत व यामुळे होणा-या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

तसेच, शैक्षणिक वर्ष **२०२१-२२** मधील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील एस.टी, एस.सी, एन.टी, ओ.बी.सी, एस.बी.सी, व राजर्षी शाहू महाराज शिक्षणशुल्क योजना (एस.ई.बी.सी.फक्त वरिष्ठ महाविद्यालय) व अन्य शिष्यवृत्तीच्या ज्या योजना आहेत. अशा सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती फॉर्म भरणेची मुदत दि. २८ फेब्रुवारी २०२२ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तरी, अद्याप पर्यंत ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे फॉर्म भरलेले नाहीत. अशा सर्व विद्यार्थ्यांनी **mahadbtmahait.gov.in** या वेबसाईटवर दि. २८/०२/२०२२ पर्यंत आपले शिष्यवृत्तीचे फॉर्म भरावेत. अन्यथा होणा-या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Notice No. 50 Displayed on : 27/04/2022

## कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील अनूसूचित जाती (एस.सी.) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अत्यंत महत्वाची सूचना.

शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मधील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील अनूसूचित जाती (एस.सी.) प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. भासशि–२०२२/प्र.क्र.७४/शिक्षण १ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई –४०००३२ दि.१७ मार्च २०२२ नुसार अनूसूचित जाती (एस.सी.) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येणा–या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र शासनाने सन २०२०–२१ ते २०२५–२६ या कालावधीकरीता जारी केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्याबाबत.

(केंद्र हिस्सा निधी वितरण पध्दती)

१) केंद्र शासनाच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या माहे – २०२१ मध्ये केंद्र शासनाने राज्य शासनसाठी निर्गमीत केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूची मधील मुद्दा क्र. ११.१ नुसार शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून सदरहू शिष्यवृत्ती योजनेंतर्गत मंजूर झालेली संपूर्ण रक्कम म्हणजेच महाविद्यालयाला देय असलेले सर्व प्रकारचे ना– परतावा शुल्क, (शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, इतर शुल्क इत्यादी.) तसेच विद्यार्थ्यांना अनुज्ञेय निर्वाह भत्ता व इतर अनुज्ञेय शुल्क/भत्ते इत्यादी रक्कम थेट विद्यार्थ्यांच्याच आधार संलग्नीकृत बँक खात्यामध्ये जमा होणे आवश्यक आहे. या करीता राज्य शासनाने PFMS या प्रणालीव्द्वारे लाभाची अदायगी करणे आवश्यक आहे. सदर सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील मुद्दा क्र. ११.२ नुसार सन २०२१–२२ पासून मंजूर झालेली शिष्यवृत्तीची रक्कम संबधित विद्यार्थ्यांच्या थेट बँक खात्यामध्ये DBT( Direct Benificiary Transfer) या तत्वावर जमा करण्यात यावी.

२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमधील मुद्दा क्र. १०.१ नुसार सन २०२१–२२ पासून भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून प्रतीवर्षी ६० % केंद्र हिस्सा व राज्य शासनाचा उर्वरित ४०% बांधील खर्च निश्चित करण्यात आलेला आहे.

त्यानुसार, शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून राज्यातील सर्व अनूसचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे मंजूर झालेली रक्कम खालीलप्रमाणे सुधारीत वितरण पध्द्तीने अदा करण्यात येणार आहे.

(अ) केंद्र शासनाच्या ६०% हिश्श्याचे वितरण:—

महाडीबीटी प्रणालीवर अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्याचा स्कॉलरशिचा अर्ज संबधित जिल्हयातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचे मार्फत मंजूर झाल्यानंतर त्या शैक्षणिक वर्षाची अनुज्ञेय शिष्यवृत्ती रक्कम प्रणालीव्द्रारे निश्चित करण्यात येते. सदरहू मंजूर करण्यात आलेली संपूर्ण शिष्यवृत्तीची रक्कम म्हणजेच महाविद्यालयास देय असणारा भाग (शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, व इतर नापरतावा शुल्क इ.) तसेच विद्यार्थ्याला देय असणारा भाग (निर्वाह भत्ता) या दोन्ही भागांचा एकत्रित रकमेचा केंद्र शासनाचा ६०% हिस्सा या प्रमाणात लाभाची रक्कम केंद्र शासनाच्या प्रणालीमध्ये निश्चित करण्यात येणार आहे. उपरोक्त ६०% हिस्सा विद्यार्थ्याने महाडीबीटी प्रणालीवर नोंदणीकृत केलेल्या अर्जानुसार विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नीकृत बँक खात्यामध्ये थेट शासनामार्फत DBT तत्वानुसार वितरीत करण्यात येणार आहे.

सदरहू केंद्र शासनाचा हिस्सा विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा झाल्यानंतर विद्यार्थ्यास अनुज्ञेय असलेला निर्वाह भत्ता वजा जाता उर्वरित महाविद्यालयास देय असलेली रक्कम विद्यार्थ्याने पुढील सात दिवसांच्या आत महाविद्यालयास जमा करणे अनिवार्य आहे. यासाठी विद्यार्थ्यांना विहित नमुन्यातील हमीपत्र द्यावे लागणार आहे याची नोंद घ्यावी.

(ब) राज्य शासनाच्या ४०% हिश्श्याचे वितरण:—

उपरोक्त मुद्दा क्रमांक (२) अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शिष्यवृत्तीच्या एकूण मंजूर झालेल्या रकमेचा केंद्र हिस्सा ६० % वजा जाता उर्वरित राज्य हिस्सा ४०% ची रक्कम राज्य शासनाच्या महाडीबीटी पोर्टल मार्फत वितरीत करण्यात येईल. सदरहू राज्य हिस्सा सन २०२०—२१ पर्यंतच्या कार्यप्रणालीनुसार DBT तत्वावर संबधित विद्यार्थ्यांचे आधार संलग्नीकृत बँक खाते व संबधित महाविद्यालयाचे बँक खात्यामध्ये थेट PFMS प्रणालीव्द्रारे मंजूर रक्कम वितरित करण्यात येईल.

तरी, वरीलप्रमाणे झालेल्या या नविन बदलाची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी व जमा झालेली शिष्यवृत्तीची रक्कम सात दिवसाच्या आत महाविद्यालयाकडे चलनानी भरावी. सदरची शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांनी खर्च करु नये ही रक्कम महाविद्यालयाची आहे. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती विभागास संपर्क करावयाचा आहे. याची विद्यार्थ्यांनी नोंद घेऊन पूर्तता करावी.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\users\amsolankar\Scholarship 18-19\Notice\Scholarship Notice New 2018-19 New.docx